महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर https://jeevandeepvarta.com मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे Rs.2/-

मंगळवार ■ 04 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 220 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# ठाणे जिल्ह्यात कफ सिरपचे रॅकेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यात तब्बल ३१.७५ लाख रुपयांच्या बंदी घातलेल्या कफ सिरपच्या बाटल्या बेकायदेशीरपणे बाळगल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पाच जणांचा अटक करण्यात आली आहे. या सर्व आरोपींची वयोमर्यादा २४ ते २५ वर्ष असल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ठाण्यात ३१.७५ लाखांच्या बंदी असलेले दोन प्रकारचे कफ सिरप मोठ्या संख्येने बेकायदेशीरपणे साठवण करुन ठेवल्याचं आढळून आलं. या औषधांचा समावेश असलेल्या कफ सिरप अर्थात खोकल्याच्या सिरपचा अनेकदा नशेसाठी गैरवापर केला जातो. यामुळे लोकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो.




## पोलिसांच्या कारवाईत पाच जण ताब्यात

पोलिसांनी आरोपींकडून जप्त केल्या १७ हजारहून अधिक बॉटल नारपोली पोलीस स्टेशनमधून दिलेल्या माहितीनुसार, एका गुप्त माहितीच्या आधारे ३१ जानेवारी रोजी भिवंडीतील पाच जणांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून कफ सिरपच्या १७ हजार ६४० बॉटल जप्त करण्यात आल्या. यात कोडीन फॉस्फेट अर्थात हे एक प्रकारचं अफीम असतं. आणि दुसरं हे रसायन होतं. या दोन प्रकारच्या बॉटल १४७ बॉक्समध्ये ठेवण्यात आले होते. या १७ हून अधिक बॉटल्सची बेकायदेशीर विक्री करण्यात येणार होती.

## बेकायदेशीर कफ सिरपचा भांडाभोड

**पोलीस अधिकाऱ्यांनी याप्रकरणी बोलताना सागितलं, की आरोपींनी हा कफ सिरपच्या औषधांचा स्टॉक कुठून मिळवला आणि ते हा स्टॉक कोणाला विक्री करणार आहे याचा तपास सुरू आहे. या बंदी असलेल्या कफ सिरपचा कशासाठी वापर केला जाणार होता? ते कोणापर्यंत बेकायदेशीपणे पोहोचणार होतं? याचा तपास सुरू आहे. याप्रकरणात जशी-जशी माहिती मिळेल, तसं इतर आरोपींना ताब्यात घेतलं जाईल. हे सर्व आरोपी २४ ते २५ वयोगटातील आहेत.**

# सरकारी कार्यालयात मराठी सक्तीची

## राज्याचे मराठी भाषा धोरण जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर आता राज्य सरकारकडून देखील मराठी भाषेला अधिक सक्षमपणे व प्रभावाने रुजविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते. शासकीय कार्यालयाने आणि शासन स्तरावरील सर्वच प्रक्रियेत माय मराठीचा अधिकाधिक व सक्तीचा वापर करण्यासंदर्भात राज्यातील फडणवीस सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी आता सर्वच शासकीय, निमशासकीय व महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य असणार आहे. तसेच, या कार्यालयात मराठी भाषेत बोलण्याबद्दल दर्शनी भागात फलका लावावा लागणार आहे, शासकीय कार्यालयांतील संगणकावरील कळफलक ही मराठी भाषेतच असणार आहेत. तर, मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणाऱ्यांवर देखील शिस्त भंगाची कारवाई केली जाणार असल्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या मराठी भाषा धोरणाच्या मसुद्यास मंत्रिमंडळाने 12 मार्च 2024 च्या बैठकीत मान्यता दिली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन मराठी भाषा विभागाने राज्याचे मराठी भाषेचे धोरण जाहीर केले आहे. मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, ही बाब लक्षात घेऊन मराठी भाषा धोरणामध्ये व्यवहारक्षेत्र निहाय शिफारसी अंतर्भूत आहेत. मराठी भाषेस येत्या 25 वर्षामध्ये ज्ञानभाषा व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे हे शासनाच्या सदर धोरणाचे अन्य उद्दिष्टांसह प्रमुख उद्दिष्ट आहे.



### संगणकावरील छापील अक्षर कळमुद्राही मराठी असावी

या धोरणामध्ये शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, संगणकीय शिक्षण, विधि व न्याय व्यवहार, वित्त व उद्योगजगत, प्रसारमाध्यमे, प्रशासनात मराठी भाषेचा वापर इत्यादी व्यवहारक्षेत्रनिहाय सविस्तर शिफारशी प्रस्तावित आहेत. त्यानुसार, महाराष्ट्र राज्यात शासकीय खरेदी व शासकीय अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या संगणक कळफलकांवरील "छापील अक्षर कळमुद्रा" रोमन लिपीबरोबरच मराठी देवनागरी लिपीत छापलेल्या / कोरलेल्या / उमटवलेल्या असणे अनिवार्य आहे. तसेच, सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयांमध्ये येणाऱ्या सर्वांनीच मराठी भाषेमधून संभाषण करणे अनिवार्य असेल. तसेच मराठी भाषेचा वापर व मराठीमध्ये संभाषण करण्याबाबत कार्यालयांमध्ये दर्शनी भागात फलक लावणेही अनिवार्य असेल. याबाबतची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, असेही या आदेशात म्हटले आहे.

### तर अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई

दरम्यान, नमूद कार्यालयांमध्ये मराठी भाषेमधून संभाषण न करणाऱ्या शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत संबंधित कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुख यांच्याकडे तक्रार करता येईल. कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुख याबाबत पडताळणी करुन तपासणीअंती संबंधित शासकीय अधिकारी / कर्मचारी दोषी आढळल्यास त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करेल. तथापि, तक्रारदारास कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुख यांनी केलेली कार्यवाही सदोष वा समाधानकारक न वाटल्यास त्यासंबंधी विधिमंडळाच्या मराठी भाषा समितीकडे अपील करता येईल.

## थोडक्यात महत्वाचे




### महाराष्ट्रात रेल्वेसाठी तेवीस हजार कोटींची तरतूद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, दि. 3 :यावर्षी म्हणजे सन २०२५-२६च्या केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यातील रेल्वेसाठी २३,७७८ कोटी रुपयांची तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईतील पत्रकारांशी संवाद साधताना दिली. रेल्वेसाठीच्या अर्थसंकल्पात विविध राज्यांसाठी केलेल्या तरतुदींसाठी आयोजित वार्ताहर परिषदेला वैष्णव यांनी दूर दृश्य पद्धतीने संबोधित केलं. राज्यात होणाऱ्या रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्र सरकार, राज्य सरकार, आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्यात झालेल्या करारामुळे या प्रकल्पांमधला राज्याचा वाटा रिझर्व्ह बँक उचलणार आहे, असंही त्यांनी सांगितलं. २०१४पासून आत्तापर्यंत राज्यात एकंदर २,१०५ किलोमीटर लांबीचे नवे रेल्वेमार्ग तयार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

### बजेटनंतर नोकरदारांना दिलासा

#### आता आरबीआय कडून व्याजदर कपातीची आशा




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, दि. 3 : केंद्रीय अर्थसंकल्पानंतर नवे RBI गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखालील पहिली धोरण बैठक 5 ते 7 फेब्रुवारी 2025 दरम्यान होणार आहे. अर्थसंकल्प 2025 नंतर मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. परंतु, आता भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) रेपो दरामध्ये कपात करून गृहकर्ज आणि वैयक्तिक कर्जाच्या हप्त्यांमध्ये (EMI) घट करणार का? आरबीआयच्या चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीत कोणता मोठा निर्णय होऊ शकतो, केंद्रीय अर्थमंत्री यांनी अर्थसंकल्प 2025-26 सादर केला आहे, ज्यामध्ये सरकारने मध्यमवर्गीयांसाठी मोठ्या घोषणा केल्या आहेत. विशेषतः, वार्षिक 12 लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकांना करसवलत मिळणार आहे. मात्र, या सवलतीनंतर आता चर्चा आहे ती RBI च्या संभाव्य रेपो दर कपातीबद्दल. 5 ते 7 फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या RBI च्या चलनविषयक धोरण समितीच्या (MPC) बैठकीत यावर निर्णय घेतला जाऊ शकतो.

# मध्यान्ह भोजनातून अंडी, नाचणी सत्व वगळण्याचा निर्णय

## अन्न अधिकार अभियानाचा निषेध



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई – महाराष्ट्र सरकारने २८ जानेवारी २०२५ च्या शासन निर्णयानुसार (जीआर) शालेय मध्यान्ह भोजनातून अंडी आणि नाचणी सत्व वगळण्याचा निर्णय घेतला आहे. अन्न अधिकार अभियानाने या निर्णयाचा तीव्र निषेध करत, हा जीआर त्वरित रद्द करण्याची मागणी केली आहे. अभियानाच्या निमंत्रक ऊल्का महाजन, मुक्ता श्रीवास्तव आणि दीपिका साहनी यांनी सांगितले की, हा निर्णय राज्यातील सुमारे ९५ लाख विद्यार्थ्यांच्या पोषण सुरक्षेला धोका निर्माण करणारा आहे. अन्न अधिकार अभियानाच्या मते, महागाईमुळे अनेक कुटुंबांना अंडी परवडत नाहीत, त्यामुळे गरीब आणि उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांसाठी शाळेत दिले जाणारे अंडे हे एक महत्त्वाचे पोषण स्रोत होते. सरकारने ही तरतूद रद्द करणे म्हणजे मुलांच्या आरोग्याशी खेळण्यासारखे आहे. भारत २०२४ च्या जागतिक भूक निर्देशांकात २७ देशांपैकी १०५ व्या स्थानावर आहे. देशातील कुपोषण, बालमृत्यू, आणि क्षयरोग यांसारख्या समस्या गंभीर आहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारने घेतलेला हा निर्णय आणखी चिंता वाढवणारा आहे, अशी टिप्पणी अन्न अधिकार अभियानाकडून करण्यात आली आहे.

इतर राज्यांमध्ये पोषण सुधारण्याचा प्रयत्न होत असताना महाराष्ट्र मात्र मागेच आहे, अशी प्रतिक्रिया देताना अभियानाने काही बाबींकडे लक्ष वेधले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने फेब्रुवारी २०२३ मध्ये लोकसभेत सादर केलेल्या अहवालानुसार, देशातील १४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश त्यांच्या स्वतःच्या निधीतून विद्यार्थ्यांना दूध, अंडी आणि फळे पुरवतात. आंध्र प्रदेशमध्ये आठवड्यात ५ दिवस अंडी दिली जाते. तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये आठवड्यात ६ दिवस अंडी पुरवली जाते. इतर काही राज्यांमध्ये आठवड्यातून २ ते ३ वेळा अंडी पुरवण्याची योजना आहे, ही बंद अभियानाने निदर्शनास आणून दिली आहे. मात्र, महाराष्ट्र सरकारने या योजना रद्द करणे, हे राज्याच्या भल्यासाठी नाही, अशीही टीका अभिमानाने केली आहे.

# मुख्यमंत्र्यांनी घेतला फ्लॅगशीप योजनांचा आढावा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा वॉररुमध्ये आढावा घेऊन या योजनांना गती देण्याचे निर्देश दिले. यामध्ये आरोग्य, गृहनिर्माण व पाणी पुरवठा विभागाच्या योजनांच्या सद्यस्थितीचा आढावा आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जिल्हानिहाय आढावा घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री पंकज भोयेर. योगेश कदम, मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन श्री. फडणवीस म्हणाले की, भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. मात्र, उर्वरित लाभार्थ्यांना तातडीने जमिन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रितपणे मार्ग काढावेत. ज्या जिल्ह्यांत घरकुलांचे उद्दिष्टपूर्ती कमी आहे, तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी ती पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावेत. तसेच घरकुल योजनेतील अडचणी दूर करून कामांना वेग द्यावे. गायरान जमिनींवरही आवास योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी. आवास योजनांसाठीच्या जमिनींच्या समस्या सोडविण्यासाठी विभागीय आयुक्तांनी लक्ष घालावे.

आवास योजनांच्या घरकुलांसाठी वाळू, वीटा व सिमेंट आदी एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी घरकुल मार्ट संकल्पना राबविण्यात यावी. यासाठी बचत गटांचे सहाय्य घ्यावे. तसेच आवास योजनांसाठी वाळू देण्यासंदर्भातील परिपत्रक पुन्हा निर्गमित करण्यात यावे. तसेच महसूल विभागाने गावठाणासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. शहरी भागातील आवास योजनांना गती देण्यासाठी नगर विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश द्यावे. तसेच आवास योजनांच्या प्रगतीची माहिती नियमित अद्ययावत करावी. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोनची मंजुरी, कामे आदी कार्यवाहीही स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेगाने करावे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# एमएमआरडीएच्या विकास परवानग्या ऑनलाईन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) अखत्यारीतील मुंबई महानगर प्रदेशातील विकास कामे आता वेग घेणार आहेत. कारण एमएमआरडीएच्या अखत्यारीतील सर्व प्रकारच्या विकास कामांसाठी आवश्यक एमएमआरडीएकडील परवानगी आता ऑनलाईन पद्धतीने देण्यास सुरुवात झाली आहे. १ फेब्रुवारीपासून विकास कामांसाठीच्या परवानग्या ऑनलाइन देण्यासंबंधीची प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे आता मुंबई महानगर प्रदेशातील एमएमआरडीएच्या अखत्यारीतील क्षेत्रात कोणत्याही विकास कामांसाठी आवश्यक असलेली एमएमआरडीएची परवानगी अतिजलद मिळणार आहे. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसह इतर बांधकाम योजनांना गती मिळणार आहे.

एमएमआरडीए मुंबई महानगर प्रदेशात अनेक क्षेत्रात विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त आहे. अशावेळी एमएमआरडीए विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या क्षेत्रातील विकास कामांसाठी एमएमआरडीएशी संबंधित विविध प्रकारच्या परवानग्या घ्याव्या लागतात. या परवानग्या घेण्यासाठी बराच काळ लागतो. ही बाब लक्षात घेता १ जून २०२३ मध्ये एमएमआरडीएने कल्याण आर्थिक विकास केंद्र आणि भिवंडीच्या आसपासच्या अधिसूचित क्षेत्रात परवानग्या संगणकीय पद्धतीने अर्थात ऑनलाईन देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठीची संगणकीय प्रणाली कार्यान्वित केली. ही प्रणाली यशस्वी आणि



कार्यक्षम ठरली आहे. यामुळे परवानग्या जलद गतीने दिल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर आता एमएमआरडीएने संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशातील एमएमआरडीएच्या अधिसूचित क्षेत्रातील विकास कामांसाठीच्या परवानग्या ऑनलाईन पद्धतीने देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती एमएमआरडीएकडून देण्यात आली आहे. या निर्णयानुसार शनिवार, १ फेब्रुवारीपासून ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून आता सर्व परवानग्या ऑनलाईन पद्धतीने मिळणार आहेत.

कल्याण आर्थिक विकास केंद्र आणि भिवंडीच्या आसपासच्या अधिसूचित क्षेत्रात ही प्रणाली याआधीच कार्यान्वित आहे. तर आता शनिवारपासून वांद्रे-कुर्ला संकुल, ओशिवार जिल्हा केंद्र, वडाळा अधिसूचित क्षेत्र, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ अधिसूचित क्षेत्रातही ही प्रणाली कार्यान्वित झाल्याचे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे आता एमएमआरडीएच्या अधिसूचित क्षेत्रातील सर्व प्रकारच्या विकास कामांसाठी एमएमआरडीएशी संबंधित सर्व प्रकारच्या परवानग्या सुलभ आणि जलद मिळण्यास मदत होणार आहे. याचा फायदा एमएमआरडीए अधिसूचित क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी लागू होणार असल्याने आता झोपु योजनांही गती घेणार आहेत. तर एमएमआरडीएच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये विस्थापित झालेल्या विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्याही जलदगतीने मिळणार आहेत. एकूणच या संगणकीय प्रणालीमुळे मुंबई महानगर प्रदेशातील विकास कामांना गती मिळेल, शहरी नियोजन अधिक दर्जेदार आणि सुलभ होईल असा विश्वास यानिमित्ताने एमएमआरडीएने व्यक्त केला आहे.

## गीतासार



आश्चर्यवत्पश्यति
कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति
तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः
श्रृणोति श्रुत्वाप्येनं वेद न
चैव कश्चित् ॥२- २९॥

एखादा महापुरुषच या आत्म्याला आश्चर्याप्रमाणे पाहातो आणि तसाच दुसरा एखादा महापुरुष या तत्त्वाचे आश्चर्याप्रमाणे वर्णन करतो. तसेच आणखी एखादा अधिकारी पुरुषच याच्याविषयी आश्चर्याप्रमाणे ऐकतो आणि कोणी कोणी तर ऐकूनही याला जाणत नाहीत. ॥ २-२९ ॥

देही नित्यमवध्योऽयं
देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं
शोचितुमर्हसि ॥२- ३०॥

हे अर्जुना, हा आत्मा सर्वांच्या शरीरात नेहमीच अवध्य असतो. म्हणून सर्व प्राण्यांच्या बाबतीत तू शोक करणे योग्य नाही. ॥ २-३० ॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न
विकम्पितुमर्हसि ।
धर्म्याद्धि
युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य
न विद्यते ॥२- ३१॥

तसेच स्वतःचा धर्म लक्षात घेऊनही तू भिता कामा नये. कारण क्षत्रियाला, धर्माला अनुसरून असलेल्या युद्धाहून दुसरे कोणतेही कल्याणकारक कर्तव्य नाही. ॥ २-३१ ॥

यदृच्छया चोपपन्नं
स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते
युद्धमीदृशम् ॥२- ३२॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), आपोआप समोर आलेले, उघडलेले स्वर्गाचे द्वारच असे हे युद्ध भाग्यवान क्षत्रियांनाच लाभते. ॥ २-३२ ॥

## आरोग्य टिप्स

### खजूर बर्फी



साहित्य-
खजूर - 500 ग्रॅम
दूध - 1 कप
तूप - चमचे दोन
सुकामेवा - 50 ग्रॅम सुकामेवा
वेलची पावडर - 1/4 टीस्पून
नारळ किसलेले - दोन टेबलस्पून

कृती-
सर्वात आधी खजूर स्वच्छ धुवून घ्यावे. तसेच त्यामधील बिया काढून टाकाव्या. यानंतर त्याचे लहान तुकडे करा. आता चिरलेल्या खजूर मिक्सरमध्ये बारीक करून त्याची गुळगुळीत पेस्ट बनवा. जर पेस्ट जाड असेल तर त्यात थोडे अधिक दूध घाला. नंतर एका पॅनमध्ये तूप गरम करावे. आता त्यात खजूराची पेस्ट घाला आणि सतत ढवळत मंद आचेवर चांगले शिजवा. नंतर पेस्ट घट्ट होऊ लागली की त्यात बारीक चिरलेली सुकी मेवे आणि वेलची पावडर आणि नारळाचा किस घालवा. यानंतर, मिश्रण घट्ट होऊन पूर्णपणे सेट झाल्यावर ते एका प्लेटमध्ये काढा आणि चमच्याने पसरवा. आता थंड होऊ द्या. तुमच्या आवडीनुसार वड्या कापून घ्या. तर चला तयार आहे आपली खजुराची बर्फी रेसिपी.

# रथसप्तमी



भारतीय संस्कृती सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यास शिकवते. त्या अनुषंगाने सूर्यदेवतेप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रथसप्तमी हा सण साजरा केला जातो. हिंदु धर्म आणि भारतीय संस्कृती यांमध्ये उच्च देवतांची उपासना आणि त्यांचे विविध सण अन् उत्सव आहेत. त्याचप्रमाणे त्यांत कनिष्ठ देवतांचीही उपासना आहे. सूर्य, चंद्र, अग्नि, पवन, वरुण आणि इंद्र या प्रमुख कनिष्ठ देवता आहेत. मानवाच्या जीवनात तसेच सर्वच प्राणिमात्रांच्या जीवनात या कनिष्ठ देवतांना महत्त्वाचे स्थान आहे.

माघ मासातील (महिन्यातील) शुक्ल सप्तमीला रथसप्तमी साजरी केली जाते. या दिवसापासून सूर्य आपल्या रथात बसून प्रवास करतो. या रथाला सात घोडे असतात; म्हणून रथसप्तमी असा शब्द वापरला जातो. ज्या सूर्यामुळे अंधार नाहीसा होतो आणि चराचराला नवे तेज, नवे जीवन लाभते, त्या भास्कराची ही पूजा आहे. ही प्रकाशाची, सूर्यदेवतेची पूजा आहे. रथसप्तमी हा स्त्रिया संक्रांतीनिमित्त करत असलेल्या हळदी-कुंकवाचा शेवटचा दिवस मानला जातो.

### रथसप्तमी सणाचे महत्त्व

सर्व संख्यांमध्ये 'सात' या अंकाचे महत्त्व विशेष आहे. 'सात' या आकड्यात त्रिगुणांचे समतोल प्रमाण असण्याबरोबर सत्त्वगुणाच्या वृद्धीसाठी आवश्यक चैतन्य, आनंद इत्यादि सूक्ष्म-लहरी ग्रहण करण्याची विशेष क्षमता असते. सप्तमी या तिथीला शक्ति अन् चैतन्य यांचा सुरेख संगम झालेला असतो. या दिवशी विशिष्ट देवतेचे तत्त्व आणि शक्ति, आनंद आणि शांति यांच्या लहरी २० टक्के जास्त प्रमाणात कार्यरत असतात. रथसप्तमीच्या दिवशी निर्गुण सूर्याच्या (अतिसूक्ष्म सूर्यतत्त्वाच्या) लहरी इतर दिवसांच्या तुलनेत ३० टक्के जास्त प्रमाणात कार्यरत असतात.

### रथसप्तमी हा सूर्यदेवाचा जन्मदिन !

'माघ शुक्ल पक्ष सप्तमीला रथसप्तमी असे म्हणतात. महर्षि कश्यप आणि देवमाता अदिती यांच्या पोटी सूर्यदेवाचा जन्म झाला, तो हा दिवस ! भगवान श्रीविष्णूचे एक रूप म्हणजेच श्री सूर्यनारायण होत. संपूर्ण विश्वाला आपल्या महातेजस्वी स्वरूपाने प्रकाशमय करणाऱ्या सूर्यदेवांमुळे पृथ्वीवर जीवन अस्तित्वात आहे.

### सूर्याचे उत्तरायणात मार्गक्रमण होत असल्याचे सूचक असलेला रथसप्तमीचा सण !

रथसप्तमी हा सण सूर्य उत्तरायणात मार्गक्रमण करत असल्याचे सूचक आहे. उत्तरायण म्हणजे उत्तर दिशेकडून मार्गक्रमण करणे. उत्तरायणात सूर्य उत्तर दिशेकडे कललेला असतो. 'श्री सूर्यनारायण आपला रथ उत्तर गोलार्धात वळवत आहेत', अशा स्थितीत रथसप्तमी दर्शवली जाते. रथसप्तमी हा सण शेतकऱ्यांसाठी सुगीचे दिवस आल्याचा आणि दक्षिण भारतात हळूहळू वाढणाऱ्या तापमानाचा दर्शक असतो, तसेच वसंत ऋतू समीप आल्याचा सूचक असतो.

### कठीण दिवसांसाठी सिद्धता करण्याची आठवण करून देणारा सण !

रथसप्तमीच्या दिवशी अंगणातील तुळशीकडे एका मातीच्या चुलीवर मातीच्या भांड्यात खीर शिजवली जाते आणि ती उतू जाईपर्यंत शिजवतात. त्यात ती खीर जळतेही. अशी चुलीवर जळलेली खीर प्रसादरूपात खायचा आनंद काही वेगळाच असतो. वर्षाचे सर्व दिवस काही सारखेच आनंद देणारे असत नाहीत. काही दिवस जळके अन्न खाऊनही काढावे लागले, तर त्याची सिद्धता हवी. याची आठवण करून देणारा हा सण !

### सूर्योपासनेचे महत्त्व आणि इतर माहिती

सूर्याच्या उपासनेने जिवाला स्वत:मधील सूक्ष्म-तेजतत्त्व वाढवण्याची संधी असते. यासाठी जिवाने तेजतत्त्वाच्या `ॐ' काराची उपासना करणे उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे गायत्रीमंत्र आणि सूर्याचे विविध मंत्र यांचे पुरश्चरण करणे फलदायी ठरते. सूर्योपासनेने जिवाच्या मनाची एकाग्रता वाढते. नेत्र हे तेजतत्त्वाशी निगडीत असल्याने सूर्योपासनेने (तेजतत्त्वाच्या उपासनेमुळे) जिवाला दिव्यदृष्टि प्राप्त होते.

रथसप्तमी साजरी करण्यामागे धार्मिक आणि वैज्ञानिक अशी दोन्ही कारणे सांगितली जातात. रथसप्तमीला आरोग्य सप्तमी असेही म्हटले जाते. रथसप्तमीः मंगळवार, ०४ फेब्रुवारी २०२५ माघ शुद्ध सप्तमी प्रारंभः मंगळवार, ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ०४ वाजून ३७ मिनिटे. माघ शुद्ध सप्तमी समाप्तीः मंगळवार, ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी मध्यरात्रौ ०२ वाजून ३० मिनिटे. भारतीय पंचांग पद्धतीत सूर्योदयाची तिथी मानण्याची प्राचीन परंपरा असल्यामुळे रथसप्तमीचे व्रत, पूजा विधी ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी करावा, असे सांगितले जाते. रथसप्तीचे व्रत हे एक सौर व्रत आहे. ही सप्तमी चौदा मन्वंतरांपैकी एका मन्वंतराची प्रारंभतिथी म्हणून महत्त्वाची मानण्यात आली आहे. भारतात सर्वत्र या व्रतानिमित्त सूर्योपासना केली जाते परंतु वेगवेगळ्या प्रांतांत व्रताचे नाव व व्रताचरणाचा तपशील या बाबतींत फरक पडतो.

**रथसप्तमी व्रत कसे करावे?** रथसप्तमी हा अदिती आणि कश्यप यांचा पुत्र 'सूर्य' याचा हा जन्मदिवस आहे, असे मानले जाते. या दिवशी सूर्य पूजन केले जाते. सूर्य पूजन करण्यासाठी सूर्योदयापूर्वी स्नान करावे. छोट्या कलशातून सूर्याला अर्घ्य दिले द्यावे. रथसप्तमीदिनी तुळशीपुढे सात घोड्यांच्या रथात स्वार झालेल्या सूर्यरथाचे चित्र काढून महिला त्याचे पूजन करतात. अंगणात दीप प्रज्वलन करून भाताचा नैवेद्य सूर्याला दाखविला जातो. सूर्यरथाला असणारे सप्त अश्व आठवड्यातील सात वार दर्शवतात. रथाची बारा चाके बारा राशींचे प्रतिक आहे, असे मानले जाते.

**रथसप्तमी व्रताचे फळ काय सांगितले जाते?** महाराष्ट्रात प्रामुख्याने हे व्रत करतात. षष्ठीला एकभुक्त राहून व्रताचा संकल्प करणे, सप्तमीला अरुणोदयाच्या वेळी स्नान करून अंगणात काढलेल्या सूर्यप्रतिमेची पूजा करणे, अंगणातच शिजविलेल्या दुधाच्या खिरीचा सूर्याला नैवेद्य दाखविणे आणि अंगणातच सूर्यासाठी दूध ऊतू जाऊ देणे हे व्रताचे स्थूल स्वरूप असते. हळदीकुंकू व वायने वाटणे असा कार्यक्रमही असतो. दक्षिणेत त्या दिवशी अनध्याय असतो आणि रात्री गायन, वादन, दीपोत्सव इ. कार्यक्रम असतात. वर्षभर सूर्योपासनेचे व्रत करून अखेरीस रथाचे दान केले असता महासप्तमी, मस्तकावर बोरीची व रुईची प्रत्येकी सात पाने धारण करून उपासना केली असता माघ सप्तमी, मस्तकावर दीप धारण करून उपासना केली असता अचला सप्तमी इत्यादींप्रकारे व्रतभेद सांगितला जातो. या दिवशीचे स्नान हेच विख्यात माघस्नान, असे काहींचे मत आहे. सर्व रोगांतून व पापांतून मुक्तता आणि सौभाग्य, पुत्र, धन इत्यादींची प्राप्ती हे या व्रताचे फळ सांगितले जाते.

# व्याजासह पैसे परत; तरीही छळ

## व्हिडिओ तयार करून संपवलं आयुष्य

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण :** भिवंडी तालुक्यातील महापोली येथे एकाने व्याजासह पैसे दिले तरीही आरोपी आणखीन पैसे उकळत असल्यामुळे व घरच्याना वारंवार धमकी या जाचाला कंटाळून एकाने विष प्राशन करून आत्महत्या केली आहे. कामील शेख असे मृत व्यक्तीचे नाव असून, ही धक्कादायक घटना भिवंडी तालुक्यातील महापोली या गावी घडली आहे या बाबत गणेशपुरी पोलीस ठाण्यात तिघा आरोपी वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 1) बहुद्दीन उर्फ मुन्ना यासीन अन्सारी, 2)आमन नसीम भावे,3) रहीमान कादिर कोतकर अशी या आरोपीची नावे आहेत.

कामिल शेख यांने तीन जणांन कडून व्याजाने 1लाख 80 हजार रुपये घेतले होते त्याची परत फेड म्हणून 3 लाख 30 हजार



रूपये व्याजा सह परत केले मात्र आरोपी यांनी जास्त व्याज दराचा तगादा लावून वारंवार त्याला मानसिक व शारीरिक त्रास देत होते. तसेच जास्त पैसे मागण्यासाठी त्याचा मागे तगादा लावत होते, या त्याच्यां त्रासाला कंटाळून अखेर कामिल शेख यांनी विष पिऊन आत्महत्या केली मात्र आत्महत्या पुर्वी एक व्हिडिओ सोशल मीडिया वर वायरल केल्याची माहिती समोर आली आहे* या विडीओ च्या आधारे व कामिल च्या भावाच्या फिर्यादी वरून गणेशपरी पोलिस ठाण्यात तब्बल एक महीन्या नंतर तिघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आले असून बहूद्दीन उर्फ मुन्ना अन्सारी याला अटक केली आहे तर आमन भावे, रहेमान कोतकर हे दोन जण फरार झाले आहेत. यातील दोघे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर गणेशपुरी पोलीस ठाण्यात विविध प्रकारचे गुन्हे ही दाखल आहेत. मयत अमीन शेख आणि आरोपी ह्याच गावात राहाणारे आहेत भावाच्या तक्रारीवरून 1) बहुद्दीन उर्फ मुन्ना यासीन अन्सारी 2)आमन नसीम भावे,3) रहीमान कादिर कोतकर यांस कडून मृत आमीन शेख यांने साबणाच्या व्यवसाया करीता घेतले होते हे पैसे व्याजा सह परत केले मात्र व्याजदर 8% टक्केची मागणी केल्याने हताश झालेल्या मृत कामिल याने अनेक वेळा विनंती केली मात्र याचा या तिघांवर काही परिणाम झाला नाही सतत गलिच्छ वागणूक देत,त्रास देऊन पत्नी व मुली बाबत अश्लील शब्द वापरत असत अखेर कामिल शेख यांने त्याचा जाचाला कंटाळून विष प्राशन केले कामिल वर भिवंडी येथे उपचार सुरू असताना 4 जानेवारी रोजी त्याचा मृत्यू झाला. मृत्यू पुर्वी त्याने आपली व्याजदरासाठी कश्या पद्धतीने छळ केला गेला याचा विडीओ तयार करून सोशल मीडिया वर वायरल केले आहे. यानंतर गणेशपुरी पोलिस ठाण्यात त्यांच्या कुटुंबीयांनी फिर्याद दिली होती. तब्बल एक महिन्याच्या प्रतिक्षे नंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली असून दोन जण फरार झाले आहेत यांचा शोध गणेशपुरी पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे हे करीत आहेत.

# ७/१२ च्या उताऱ्यात होणार मोठे बदल

**मुंबई :** राज्य सरकारच्या महसूल विभागाने तब्बल 50 वर्षांनंतर सातबारा उताऱ्यात महत्त्वाचे बदल केले आहेत. तसेच ज्या काही नवीन सुधारणा आहेत त्या सातबारा उताऱ्याला अधिक स्पष्ट, अचूक करण्याच्या दृष्टीने केल्या गेल्या आहेत.




सातबारा उताऱ्यात करण्यात आलेले 11 महत्त्वाचे बदल

1) गावाच्या नावासोबत कोड क्रमांक – गाव नमुना-7 मध्ये आता गावाचा कोड क्रमांक (Local Government Directory) दिसतो.

2) जमिनीच्या क्षेत्राची स्पष्टता – लागवडीयोग्य आणि पोटखराब क्षेत्र स्वतंत्रपणे दर्शवले जाते. आणि त्यांची एकूण बेरीज दाखवली जाते.

3)नवीन क्षेत्र मापन पद्धती – शेतीसाठी 'हेक्टर आर चौरस मीटर', तर बिनशेतीसाठी 'आर चौरस मीटर' हे एकक वापरण्यात येते.

4) खाते क्रमांकाची स्पष्टता – यापूर्वी 'इतर हक्क' मध्ये दिला जाणारा खाते क्रमांक आता थेट खातेदाराच्या नावासमोर असतो.

5) मयत खातेदारांच्या नोंदणीत बदल – मृत व्यक्ती, कर्जबोजे आणि ई-कराराच्या नोंदी कंसात दर्शवण्याऐवजी त्यावर आडवी रेष मारली जाते.

6) प्रलंबित फेरफारांची स्वतंत्र नोंद – फेरफार प्रक्रिया पूर्ण न झालेल्या जमिनींसाठी 'प्रलंबित फेरफार' हा स्वतंत्र रकाना तयार केला जातो.

7) जुने फेरफार क्रमांक वेगळे – सर्व जुन्या फेरफार क्रमांकांसाठी वेगळा रकाना तयार करण्यात आला आहे.

8) खातेदारांच्या नावांमध्ये ठळक रेषा – दोन खातेदारांच्या नावामध्ये ठळक रेष असणार, त्यामुळे नावे स्पष्टपणे वाचता येते.

9) गट क्रमांक आणि शेवटचा व्यवहार – गट क्रमांकासोबत शेवटचा फेरफार क्रमांक आणि त्याची तारीख इतर हक्क रकान्यात शेवटी दाखवली जाते.

10) बिनशेती जमिनींसाठी नवीन बदल – बिनशेती क्षेत्रासाठी 'आर चौरस मीटर' हेच एकक राहणार असून, जुडी व विशेष आकारणी रकाने काढून टाकण्यात आले आहेत.

11) अकृषिक जमिनींसाठी विशेष सूचना – बिनशेतीच्या सातबारा उताऱ्याच्या शेवटी आता "सदरचे क्षेत्र अकृषक क्षेत्रामध्ये रुपांतरित झाले असल्याने गाव नमुना-12 लागू नाही" अशी सूचना दिली जाते.

# संस्कृती संवर्धन फाउंडेशनची विद्यार्थ्यांना मदत

## आश्रमातील विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**ठाणे :** दि.२ फेब्रुवारी २०२५ रोजी समाजातील गरजू आणि निराधार मुलांच्या उज्वल भविष्यासाठी संस्कृती संवर्धन फाउंडेशनने सामाजिक उपक्रम राबवत डोंबिवली येथील अंकुर बाल विकास केंद्र आश्रमातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पेन, पेन्सिल यांसारख्या गरजेच्या वस्तू प्रदान करण्यात आल्या. या वितरण कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मुलांशी संवाद साधून त्यांना शिक्षणाची आणि नैतिक मूल्यांची महत्त्वाची जाणीव करून दिली. संस्थेच्या अध्यक्ष अ‍ॅड.रणधीर सकपाळ यांनी सांगितले की, "समाजातील प्रत्येक बालकाला शिक्षण मिळावे आणि त्यांची प्रगती साधण्यासाठी आवश्यक मदत मिळावी, हा आमचा उद्देश आहे. भविष्यातही असे उपक्रम संस्थेच्या वतीने सातत्याने राबवले जातील." या कार्यक्रमाला मनसेचे ठाणे जिल्हा उपाध्यक्ष दिप्तेश नाईक,संस्थेचे सचिव,रॉकी हिंदुस्थानी,अ‍ॅड.प्राजक्ता उतेकर,अ‍ॅड.भावना सोनवणे,अ‍ॅड.हर्षल वाघ,सुधीर सकपाळ, विनायक चिंदरकर, पूनम जाधव, राहुल जागडे,प्रमोद भारती,आणि विकास रेणोसे इ.सामाजिक कार्यकर्त्यांचीही महत्वाचे सहकार्य आणि उपस्थिती लाभली. उपस्थितांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांमध्ये अधिकाधिक लोकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. अंकुर बाल आश्रमाच्या संचालिका हर्षदा भोसले यांनी संस्कृती संवर्धन फाउंडेशनने केलेल्या मदतीबद्दल विशेष आभार व्यक्त केले. तसेच फाउंडेशनचे अध्यक्ष अ‍ॅड.रणधीर सकपाळ यांनी संस्थेला मदत करणाऱ्या सर्व देणगीदार बंधू भगिनींचे फॉउंडेशनतर्फे आभार व्यक्त केले. संस्कृती संवर्धन फाउंडेशनच्या या स्तुत्य उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची आणि विकासाची संधी मिळणार असून, समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

# पडघ्यात कुणबी- मराठा विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कुणबी व मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी ठाणे जिल्ह्यात एमकेसीएल च्या निवडक केंद्रांवर मोफत संगणक व व्यक्तिमत्व विकासाचे प्रशिक्षण दिले जाणार असुन विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र सारथी संस्थेचा उपक्रमाद्वारे महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. पुणे या प्रशिक्षण संस्थेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात तालुकास्तरापर्यंत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कुणबी-मराठा या गटाच्या दहावी पास १८ ते ४५ या वयोगटांतील उमेदवारांकरिता महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात तालुकास्तरांपर्यंत नि:शुल्क (मोफत) व्यक्तिमत्व व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण घेण्यासाठी सारथी लक्षीत गटातील पात्र उमेदवाराकडून ऑनलाइन अर्ज मागवण्यात येत असुन ठाणे जिल्ह्यातील एमकेसीएल निवडक अधिकृत अध्ययन केंद्रावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या अभ्याक्रमात विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिश आणि आयटी शिकवले जाणार असून, इतर दोन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी निवडायचे आहेत.त्याचा लाभ विद्यार्थ्यांनीं घ्यावा. व या विषयी संपूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन पडघा येथील ओम शांती कॉम्प्युटर क्लासेसचे संचालक संजय पटेल व पुजा पवार यांनी केले आहे.तसेच नुकतेच पडघा परिसरातील २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित भादाणे व राहुर गृप ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत सारथी मोफत संगणक प्रशिक्षण योजनेबद्दल सवीस्तर माहीती देऊन त्यांच्यामार्फत कुणबी मराठा गटातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण घेण्यासाठी सांगण्यात आले.

# तरुणांचे वाढते रस्ते अपघात चिंताजनक

मागिल काही वर्षात फक्त मुरबाड तालुक्याचा विचार केल्यास अत्यंत धक्कादायक आणि चिंतेची बाब प्रकर्षाने समोर येते ती म्हणजे रस्ते अपघातात जाणारे तरूण मुलांचे जीव. कोणतेही वाहन चालविताना चुकीला माफी नाही हा वाहतुकीचा सिद्धांत म्हणालो तरी चुकीचे ठरणार नाही. वाहन रस्त्यावर चालविताना आपली एक चुक थेट मृत्युला आमंत्रण देणारी ठरू शकते हे शेकडो अपघातातून समोर दिसत असताना सुद्धा आजची तरणाई यातून शिकायला तयार नाही हे मात्र नक्की.गेल्या काही वर्षात जास्त अपघात हे मोटार सायकल चालविताना झाले असल्याचे पाहायला मिळत असून यामध्ये 18 ते 25 वयोगटातील शेकडो तरूण मुलांचा जीव गेला आहे. शासनाच्या वाहतूक विभागाकडून रस्ते सुरक्षित अभियानातून जनजागृती केली जात असली तरी आजची पिढी त्या वाहतुक नियमांचे पालन करताना मात्र दिसत नाही. मग यामध्ये वेगावर नियंत्रण नसणे, चुकीच्या ठिकाणी गाडी चालविणे , हेल्मेटचा वापर न करने, स्टंटबाजी करने, दोन पेक्षा अधिक सिट घेऊन गाडी चालवणे या चुका महागात पडत असून यामध्ये आजपर्यंत शेकडो जणांचे प्राण गेलेत तर हजारो कायमचे जायबंदी झाले आहेत. मुरबाड तालुक्याचा विचार केल्यास मागिल आठवड्यात किमान पाच ते सहा जणांचा मोटारसायकल चालविताना अपघात झाला असून वडवली व धसई येथील दोन तरूणांना आपला जीव गमवावा लागला आहे.ऐन तारुण्यात अपघाताने आई- वडिलांना आपला मुलगा गमवावा लागतो, लग्न झालेल्या मुलीला आपला नवरा तर कुणाला आपला भाऊ कायमचा सोडून जातो. फार भयानक प्रसंग त्या कुटंबावर उभा राहतो. ज्या मुलाने आई वडिलांना आधार देण्याची वेळ येते, कुटुंब सांभाळण्याची वेळ येते त्याच आई वडिलांना दुरदैवाने आपल्या मुलाला खांदेकरि होऊन चिताअग्नी द्यावा लागतो हे पाहून त्या माता- पित्यांच्या दुख्खाचे वर्णन शब्दात न करण्यासारखे आहे. या जगात मृत्यू हा अटल आहे. प्रत्येकाला एक ना एक दिवस हे जग सोडुन जावे लागणार आहे हे जरि अंतिम सत्य असले तरी अशा प्रकारे बेदरकारपणे गाड्या चालवुन ओढून घेतलेला मृत्यू नको.तालुक्यात होणारे अपघातांचे प्रमाण पाहता तरूण वर्गाने नक्कीच यातुन बोध घ्यावा ,स्वतःच्या स्टंटगिरिला आवर घालावा व आपला अमुल्य जिव वाचवावा हिच अपेक्षा या लेख प्रपंचातून व्यक्त करतो.

- श्री. दिलीप पवार

# मंत्रालयातील प्रवेशाची वेळ : नागरिकांची गैरसोय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके- अंबाडी :** मंत्रालय स्तरावरील कामे करण्यासाठी राज्यातील विविध भागातून नागरिक मोठ्या अपेक्षेने येत असतात,परंतु गेल्या अनेक वर्षांपासून शासनाने नागरिकांना सकाळी किमान 11 वाजता पासून प्रवेश प्रक्रिया बंद करून,दुपारी 2 वाजता वेळ ठेवल्यामुळे नागरिकांची कुचंबणा होत असल्यामुळेच नागरिकांची सद्यस्थितीत शासनाविरोधात तीव्र नाराजी आहे.

मंत्रालय स्तरावरील कामे ही अन्यायकारक असल्यामुळेच याबाबतीत आपणास नक्कीच न्याय मिळेल या भावनेने नागरिक मंत्रालयात येत असतात, परंतु मंत्रालय प्रशासनाने नागरिकांसाठी ही वेळ सकाळी 11 वाजता प्रवेशाऐवजी दुपारी 2 वाजताची ठेवल्याने नागरिकांची अपेक्षेप्रमाणे कोणतीच कामे होत नाहीत,तर मोठ्या नाराजीने घरी परतावे लागते,ही केवळ नाराजी नसून,मोठी कुचंबणा असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून "दैनिक पुढारी" प्रतिनिधी यांच्याकडे व्यक्त करण्यात आली.

याबाबत सविस्तर वृत्त याप्रमाणे मंत्रालयात प्रवेश घेण्यासाठी प्रवेशपत्र घेणे बंधनकारक असल्यामुळे राज्यभरातील अनेक ठिकाणांहून नागरिक येत असतात.प्रवेशपत्र ओळखपरेड करिता भल्या मोठ्या रांगेत नागरिकांना तासनतास प्रतिक्षा कराव्या लागतात,त्यानंतर आपल्या कामासाठी मिळणारा वेळ अपुरा असतो,त्याचबरोबर ज्या-ज्या विभागात संबंधित कामे असतात, तेथील मंत्री महोदय किंवा अधिकारी तसेच कर्मचारीवर्ग दुपारनंतर भेटणे दुरापास्त होते,आणि शेवटी नियोजित कामे न होताच निराश होऊन नागरिकांना घरी परतावे लागत आहे,ही वस्तुस्थिती अजिबात नाकारता येण्यासारखी नाही.मंत्रालयात येणारे नागरिक अगदी अबाल-वृद्धांपासुन अनेकांचा समावेश यामध्ये आहे,की ज्यांना मंत्री महोदय किंवा अधिकारी यांना भेटण्यासाठी तासनतास ताटकळत राहावे लागत आहे,ही परिस्थिती बदलण्यासाठी मंत्रालयीन प्रशासनाने नागरिकांची होणारी कुचंबणा टाळण्यासाठी योग्य तो पर्याय काढावा,व नागरिकांची कामे करण्यासाठी सकाळी 11 वाजतापासूनची वेळ देण्याची मागणी तमाम महाराष्ट्रातील नागरिकांकडून राज्य शासनाला करण्यात येत आहे.






# रुणवाल गार्डन ते डोंबिवली स्थानक, नवी मुंबईकरीता बस सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली पूर्वेतील कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील रुणवाल गार्ड माय सिटी ते डोंबिवली रेल्वे स्थानक आणि रुणवाल गार्डन ते वाशी नवी मुंबई अशा बस फेऱ्या कल्याण डोंबिवली पालिका परिवहन उपक्रमाच्या सहकार्याने सुरू करण्यात आल्या आहेत. रुणवाल गार्डनमधील रहिवासी, ज्येष्ठ नागरिकांच्या मागणीवरून या बस सुरू करण्यात आल्या आहेत. सकाळच्या गर्दीच्या वेळेत दोन फेऱ्या, संध्याकाळी दोन फेऱ्या असे या बसफेऱ्यांचे नियोजन आहे.

डोंबिवली रेल्वे स्थानकापासून ते रुणवाल गार्डन स्वतंत्र बसची सुविधा नसल्याने या गृहसंकुलातून प्रवास करणाऱ्या नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, वृध्द, शाळकरी विद्यार्थी यांना रिक्षा सेवेवर अवलंबून राहावे लागत होते. डोंबिवली रेल्वे स्थानकापासून रुणवाल गार्डन गृहसंकुलात येण्यासाठी रिक्षा चालक सहजासहजी तयार होत नव्हते. त्यामुळे प्रवाशांची दररोज कुचंबणा होत होती. तसेच, रुणवाल गार्डन गृहसंकुलातून अनेक रहिवासी नवी मुंबईत नोकरी व्यवसायासाठी जातात. त्यांना केडीएमटी, नवी मुंबई परिवहन सेवेच्या बसवर अवलंबून राहावे लागत होते. नवी मुंबईत जाणाऱ्या या बस कल्याण, डोंबिवली शहरातूनच प्रवाशांची खचाखच भरून येत होत्या. रुणवाल गार्डनमधील नोकरदारांना या बसना लोंबकळत प्रवास करावा लागत होता.

> रुणवाल गार्डनमधील सुमारे साडे सहा हजार लोकांची स्वतंत्र बससेवेची मागणी होती. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्याने ही बससेवा रुणवाल गार्डनमधील रहिवाशांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवाशांचा या बसना चांगला प्रतिसाद मिळाला तर या फेऱ्या वाढविण्यात येतील.
> -राजेश मोरे,
> आमदार, कल्याण ग्रामीण.

रुणवाल गार्डनमधून प्रवास करताना होणाऱ्या त्रासाची माहिती रहिवासी, ज्येष्ठ नागरिकांनी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांना दिली होती. आमदार मोरे यांनी ही माहिती कल्याणचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांना दिली. खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी याविषयी पालिका आयुक्त डॉक्टर इंदुराणी जाखड यांच्याशी चर्चा करून रुणवाल गार्डनमधील रहिवाशांची कैफियत त्यांना सांगितली. आयुक्त डॉक्टर जाखड यांनी रुणवाल गार्डनमधील रहिवाशांच्या सोयीसाठी डोंबिवली रेल्वे स्थानक ते वाशी बस फेऱ्या सुरू करण्यासाठी कल्याण डोंबिवली पालिकेच्या बस उपलब्ध करून देण्याचे आश्वास दिले. रुणवाल गार्डनमध्ये सुमारे तीन हजार कुटुंब वास्तव्यास आहेत. या संकुलात सुमारे साडे सहा हजार लोक वस्ती आहे.

आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे रुणवाल गार्डन ते डोंबिवली रेल्वे स्थानक, रुणवाल गार्डन ते वाशी बस फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत. आमदार राजेश मोरे, शिंदे शिवसेनेचे पदाधिकारी महेश पाटील, दत्ता वझे, रुणवाल गार्डनमधील रहिवासी यांच्या उपस्थितीत शनिवारी या बस फेऱ्यांचे उद्घाटन करण्यात आले.

## अंबरनाथमध्ये
# महिलेची हत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथः अंबरनाथ शहराच्या मध्यवर्ती भागात एका महिलेची भरदिवसा हत्या झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास उड्डाणपुलाला त्याखालील रस्त्याला जोडणाऱ्या पायऱ्यांशेजारी ही हत्या झाली. यातील महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही. मात्र एका व्यक्तीने चाकू भोसकून ही हत्या केल्याची प्राथमिक माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच तात्काळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

अंबरनाथ पूर्वेतील हुतात्मा चौक परिसरातून पूर्वेत जाणाऱ्या मार्गिकेवर उड्डाणपुल आहे. या उड्डाणपुलाला स्थानक रस्त्याला जोडण्यासाठी पायऱ्या आहेत. या भागातून एक महिला आणि पुरूष बोलत असताना काही प्रत्यक्षदर्शींना दिसले. काही काळानंतर पुरूषाने चाकूने महिलेला भोसकल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. भोसकल्यानंतर तात्काळ आरोपीने जागेवरून पळ काढला. त्यानंतर काही नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित महिलेला जवळच्या खासगी रूग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत तीचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणाची माहिती मिळताच तात्काळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तपास सुरू केला असून महिलेची ओळख पटू शकलेली नाही. तर संशयीत आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या हत्येचे कारण स्पष्ट होऊ शकलेले नाही.

> **कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर**
>
> भरदिवसा घडलेल्या या हत्येच्या घटनेमुळे अंबरनाथ शहरात खळबळ उडाली आहे. दरम्यान यामुळे राज्यातील कायदा आणि व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्रात गुन्हेगारीच्या घटनेत वाढ होत असताना यावर कडक कायद्याची अंमलबजावणी कधी केली जाणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे·

# अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांची शहापूर तालुक्यातील विविध ठिकाणी भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे,दि.03 : अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे यांनी आज शहापूर तालुक्यातील तहसिलदार कार्यालय, तलाठी कार्यालय, ॲग्रीस्टॅक शिबिर, आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा इत्यादी ठिकाणी भेटी देवून तेथील आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी तहसिलदार कार्यालयाला भेट देवून शासनाच्या 100 दिवस कृती आराखड्याच्या अनुषंगाने कार्यालय परिसराची पाहणी केली व बैठक घेवून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. तसेच त्यांनी वाशिंद तलाठी कार्यालय व मंडळ कार्यालय येथे दप्तर तपासणी केली व वाशिंद येथील जिल्हा परिषद शाळेत भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांसोबत हितगुज केला. त्याचप्रमाणे वाशिंद येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे भेट देवून तेथील ओपीडी, लॅबला भेट देवून तेथील कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच अपर जिल्हाधिकारी मनीषा जायभाये-धुळे यांनी दहागाव येथील ॲग्रीस्टॅक शिबिराला भेट देवून शेतकऱ्यांसोबत त्यांच्या बांधावर जाऊन संवाद साधला, त्यांना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या या कृतीने प्रभावित होवून शेतकऱ्यांनी त्यांना फळभाज्या भेट म्हणून दिल्या.



यावेळी शहापूर तहसिलदार परमेश्वर कासुळे, तलाठी, मंडळ अधिकारी, वाशिंद प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचारी, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक-विद्यार्थी व शेतकरी उपस्थित होते.



# वाढत्या अतिक्रमणांकडे नवी मुंबई महापालिकेचे दुर्लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबईतील तुर्भे सेक्टर १९ एफ येथील भूखंड क्रमांक १ व ४ वरिल अनधिकृत झोपडपट्टी, व्यवसायिक गाळे, गॅरेज व वाहन पार्किंग बाबत वारंवार तक्रार, आंदोलन करूनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. मागील महिन्यातही जन आंदोलन पुकारण्यात आले होते. त्यानंतर नवी मुंबई महानगरपालिकेने कारवाईचे आदेशदेखील दिले आहेत मात्र विविध कारणास्तव कारवाई करण्यासाठी तारीख पे तारीख मिळत आहे. त्यामुळे आता येथील नागरिक आयुक्तांच्या दालनात आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

वाशी,सेक्टर १९ एफ तुर्भे येथील भूखंड क्रमांक १ व ४ वर अतिक्रमण करून या ठिकाणी अनधिकृत झोपडपट्टी, व्यवसायिक गाळे, गॅरेज व अनधिकृत अवजड वाहन पार्किंग करण्यात येते. या भूखंडाच्या हाकेच्या अंतरावर दोन इंटरनॅशनल शाळा आहेत. तसेच या परिसरात सिडकोने निर्माण केलेल्या वसाहतीत तसेच इमारतीत २५ हजारांपेक्षा जास्त नागरिक राहतात. तसेच त्याच्या लगतच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. अशा गजबजलेल्या परिसरात राजरोसपणे झोपडपट्टीतून अंमली पदार्थांची विक्री, बांगलादेशी नागरिकांचे छुपे वास्तव्य, रात्रीच्या वेळी उघड्यावर देह व्यापार, अनधिकृत ट्रक टर्मिनल सुरू आहे. यामुळे नागरिक हवालदिल झाले आहेत. गेल्या काही वर्षांपासून सेक्टर २६ मधील अनेक लोकप्रतिनीधी, समाजसेवक, गृहसंकुल तसेच नागरिकांच्या वतीने वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र आतापर्यंत प्रशासनाकडून कोणतीही कडक कारवाई करण्यात आलेली नाही. डिसेंबरमध्ये या ठिकाणी जनआंदोलन पुकारण्यात आले होते. त्यावेळी आमदार गणेश नाईक यांनी त्यांचा ताफा थांबवून आंदोलनादरम्यान नागरिकांची चौकशी केली आणि हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. तसेच नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी येथील अनधिकृत झोपडपट्टी निष्कासित करण्याचे आदेश देखील दिले आहेत. जानेवारी मध्ये १३ जानेवारी, २३ जानेवारी आणि त्यांनतर ३० जानेवारी या तीन तारीख देण्यात आल्या होत्या, मात्र विविध कारणे देऊन येथील कारवाई पुढे ढकलण्यात येत आहे.

> तुर्भे येथील मोकळ्या भूखंडावरील अतिक्रमणबाबत वारंवार तक्रारी तसेच आंदोलन करून देखील ठोस कारवाई होत नाही. पालिकेने येथील अतिक्रमण निष्काषित करण्याच्या आदेश दिले असतानाही प्रत्यक्ष कारवाईसाठी केवळ विविध तारखा दिल्या जात आहेत. त्यामुळे आता आम्ही महापालिका आयुक्तांच्या दालनातच आंदोलनाला बसणार आहोत. - संकेत डोके, अध्यक्ष, नागरी कृती समिती

# महाराष्ट्र केसरीच्या पंचांना जन्मठेप देणार का?
## कुस्ती प्रशिक्षकांचा संतप्त सवाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र केसरी २०२५ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे एकमेकांविरूद्ध भिडले. महाराष्ट्र केसरीच्या पंचांनी अवघ्या ४० सेकंदात पृथ्वीराज मोहोळ विजयी झाल्याचं घोषित केलं आणि यानंतर कुस्तीच्या मॅटवर मोठा वादंग पाहायला मिळाला. शिवराज राक्षेने पंचांशी हुज्जत घातली. शिवराजने रिव्ह्यू पाहून निर्णय देण्याची मागणी केली पण पंचांनी त्याकडे दुर्लक्ष केले. मग त्याने पंचांशी बोलताना त्यांची कॉलर धरली आणि लाथदेखील मारली. यानंतर शिवराज राक्षेवर कुस्तीगीर परिषदेने ३ वर्षांच्या निलंबनाची कारवाई केली आहे. शिवराज राक्षेच्या या वादावर अर्जुन पुरस्कारप्राप्त कुस्तीपटू आणि प्रशिक्षक काका पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे आणि अनेक सवाल विचारले आहेत. महाराष्ट्र केसरी कोण होणार हे स्पर्धेच्या आधीच ठरलं जातं असा गंभीर आरोप काका पवारांनी केला आहे. शिवराज आणि महेंद्र गायकवाड ३ वर्षांची बंदी घातल्यानंतर पंचांना जन्मठेप द्या अशी मागणीदेखील काका पवारांनी केली आहे. पण शिवराजच्या चुकीचं समर्थन करणार नसल्याचंही त्यांनी सांगितलं.

# तिसाई प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 11 फेब्रुवारीला बारावी तर 21 फेब्रुवारी पासून दहावी स्टेट बोर्ड परीक्षेला सुरुवात होत आहे. कल्याण पूर्वेत माजी आमदार गणपत गायकवाड यांच्या माध्यमातून तिसाई प्रतिष्ठानच्या वतीने दर वर्षी दहावी बारावी नंतर काय.? करिअर मार्गदर्शन व बोर्ड परीक्षेची भीती कमी व्हावी याकरिता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला जातो तसेच करियर मार्गदर्शन पुस्तिका व बोर्ड परीक्षेकरिता मोफत साहित्य दिले जाते. यावर्षी देखील आमदार सुलभा गायकवाड यांच्यामार्फत तिसगाव तिसाई मंदिराच्या परिसरात मार्गदर्शन व परीक्षेकारिता मोफत साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित केला होता.



महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त सम्राट अशोक विद्यालयाचे मुख्याध्यापक गुलाबराव पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, दहावी बारावी पास होणे फार सोपे आहे अंतर्गत मूल्यमापनात शाळांकडून विद्यार्थ्यांना समाधानकारक गुण दिले जातात. लेखी परीक्षेत मोजकेच गुण मिळाले तरी विद्यार्थी पास होतात. बोर्ड परीक्षेच्या वेळापत्रकात एक दिवसाआड पेपर असल्यामुळे अभ्यासाला देखील वेळ मिळतो सर्व विषय पास आहे, एका विषयात कमी गुण आहेत अशावेळी बोर्ड आपल्याला बोनस गुण देत असते. म्हणून पास होणे फार सोपे आहे परीक्षेची भीती बाळगू नका. आपण आपल्या आरोग्याची काळजी घेऊन गुणवत्तेनुसार गुण मिळवा असे आवाहन गुलाबराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना केले.

पालकांना सुद्धा सांगणे आहे आपल्या मुलांवर टक्केवारीचे ओझे लादू नका. त्यांच्या कुवती प्रमाणे त्यांना गुण मिळवू द्या. काठावर पास झाला तरी त्याला कॉलेजला प्रवेश मिळणारच आहे. असेही गुलाबराव पाटील म्हणाले. कार्यक्रमाला 1800 पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. एमकेसीएलचे प्रवक्ते सुरेश जाधव, नीट आयआयटी लेक्चरर विवेक शर्मा यांचेही दहावी बारावीनंतर काय.? यावर मार्गदर्शन झाले. विद्यार्थ्यांना करियर मार्गदर्शन पुस्तिका आणि परीक्षेकरिता शैक्षणिक साहित्य मोफत आमदार सुलभा गायकवाड व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला अमित धानजी, मनोज माळी, प्रमोद माने, विशाल जोगदंड, दिपक गायकवाड आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल ऐटम यांनी केले तर आभार अविनाश ओंबासे यांनी मानले.

# मांडा टिटवाळ्यातील अनधिकृत बांधकामांवर पालिकेची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बेकायदा बांधकामांचे आगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टिटवाळा-मांडा परिसरातील बेकायदा बांधकामांच्या विरुध्द कल्याण डोंबिवली पालिकेच्या अ प्रभागातील नवनियुक्त साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी पदभार स्वीकारताच जोरदार मोहीम सुरू केली आहे. शुक्रवारी टिटवाळा गणेशवाडी परिसरातील पंधराहून अधिक चाळी बांधण्यासाठीचे जोते तोडकाम पथकाने शुक्रवारी जमीनदोस्त केले.

टिटवाळा-मांडा, बल्याणी, उंबार्णी, आंबिवली, बल्याणी टेकडी भागात बेसुमार बेकायदा चाळी उभारणीची कामे सुरू असल्याच्या वाढत्या तक्रारी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त यांच्याकडे नागरिकांकडून येत होत्या. या चाळींमध्ये समाजकंटक, बांग्लादेशी घुसखोर यांचा रहिवास होण्याची शक्यता विचारात घेऊन या बेकायदा चाळींवर कारवाई करण्यासाठी जागरूक नागरिक आग्रही होते. या बेकायदा चाळींवर कारवाई करण्यासाठी आयुक्त डॉ. जाखड यांनी तत्कालीन साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना आदेश दिले होते. अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांनीही रोकडे याना बेकायदा बांधकामांवर आक्रमक कारवाई करा असे वेळोवेळी सूचित केले होते. साहाय्यक आयुक्त रोकडे कारवाई करण्यात टाळाटाळ करत असल्याने आयुक्त डॉ. जाखड साहाय्यक आयुक्त रोकडे यांच्या संथगती कामाविषयी नाराज होत्या. रोकडे यांच्याकडून टिटवाळ्यातील बेकायदा बांधकामांवर कारवाई होण्याची शक्यता नसल्याने अखेर आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी रोकडे यांना अ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त पदावरून तडकाफडकी हटवून तेथे प्रमोद पाटील यांची साहाय्यक आयुक्त पदावर वर्णी लावली. साहाय्यक आयुक्त पाटील यांनी शुक्रवारी पदभार स्वीकारताच पहिल्याच दिवशी टिटवाळा, मांडा भागातील गणेशवाडी परिसरातील पंधराहून अधिक बेकायदा चाळी उभारणीसाठी बांधलेली दगडी जोती जेसीबी, कामगारांच्या साहाय्याने तोडून टाकली.




> आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या निर्देशाप्रमाणे टिटवाळा-मांडा परिसरातील बेकायदा इमारती, चाळी, व्यापारी गाळे येत्या काही दिवसात नियोजन करून भुईसपाट करण्यात येतील. जी बांधकामे यापूर्वीच अनधिकृत घोषित करण्यात आली आहेत. ती पहिले तोडली जातील. सरकारी, पालिका आरक्षित जमिनींवरील बेकायदा चाळी, इमारती भुईसपाट केल्या जातील.
> -प्रमोद पाटील,
> साहाय्यक आयुक्त, अ प्रभाग.

टिटवाळा परिसरात उभ्या राहिलेल्या एकाही बेकायदा इमारतीवर मागील तीन वर्षाच्या काळात कारवाई झालेली नाही. साहाय्यक आयुक्त पाटील हे कर्तव्यकठोर अधिकारी म्हणून ओळखले जातात. कोणाचाही मुलाहिजा न ठेवता ते टिटवाळा परिसरातील बेकायदा चाळी भुईसपाट करतील, असा विश्वास नागरिकांनाही आहे. त्याची चुणूक पहिल्याच दिवशी पाटील यांनी बेकायदा चाळींचे जोते भुईसपाट करून दाखवली आहे. बेकायदा बांधकामांवर कारवाई, मालमत्ता कर वसुलीचे आव्हान साहाय्यक आयुक्त पाटील यांच्यासमोर असणार आहे.

# बदनामी करणाऱ्यांना तात्काळ शासन व्हावे - चारुदत्त आफळे
## ब्राह्मण संमेलनात ठराव संमत □ मुख्यमंत्र्यांना पाठवणार निवेदन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तींबद्दल कोणतेही पुरावे नसताना मानहानी करणारे वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीविरोधात राज्य शासनाने त्वरित कठोर शासन करण्याची भूमिका घ्यावी वेळप्रसंगी अशा व्यक्तींना तुरुंगात धाडावे, जेणेकरून कोणाचाही अपमान होणार नाही. राष्ट्रपुरुष, सन्माननिय व्यक्ती तसेच सामान्यांचा मान राखला जाईल अशी जनहितावह सर्वसामावेशक भूमिका घेणे ही काळाची गरज आहे. ब्राह्मण महासंघ, डोंबिवली या संस्थेने



ती जबाबदारी घेऊन तशी सूचना राज्य शासनाला करावी असे मत प्रख्यात राष्ट्रीय कीर्तनकार, व्याख्याते ह.भ.प. चारुदत्त आफळे यांनी रविवारी डोंबिवलीत केले.

ब्राह्मण महासंघाने शहरातील सर्व संलग्न ब्राह्मण ज्ञाती संस्थांच्या सहकार्याने ब्राह्मण संमेलन- २०२५ भरवले होते. डोंबिवली येथील टिळकनगर शाळेच्या मैदानात ब्राह्मण संमेलन संपन्न झाले, त्यावेळी ह. भ प. चारुदत्त आफळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यानिमित्ताने संस्थेने स्वरोत्सव हा गायक, कवी किरण फाटक यांनी त्यांच्यासह ५ कलाकारांच्या साथीने गाण्याचा कार्यक्रम सादर केला. ब्राह्मण महासंघ, डोंबिवली संस्थेचे अध्यक्ष मानस पिंगळे, कार्यवाह अनघा बोंद्रे, उपाध्यक्ष आणि संमेलन कार्यक्रम प्रमुख अनिकेत घमंडी, उपाध्यक्ष निलेश वीरकर, कोषाध्यक्ष जयंत कुलकर्णी, सह कोषाध्यक्ष उल्हास दाते आदींसह इतर कार्यकारिणी सदस्यांनी त्याच्या आयोजनाची जबाबदारी घेतली होती. ब्राह्मण ज्ञाती संस्थाध्यक्ष आणि शेकडो ब्राह्मण नागरिक त्यावेळी उपस्थित होते.

दोन सत्रात कार्यक्रम संपन्न झाला. आफळे यांच्या सुचनेनूसार महासंघाने तसा ठराव संमत करून सर्व उपस्थितांसमक्ष तसे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्याचे जाहीर केले. त्यानिमित्ताने ज्ञातीतील अप्पा जोशी- सामाजिक , डॉ शुभदा जोशी -तत्वज्ञान, स्वरूप पुराणिक आणि अभिराज वीरकर - क्रीडा, वृशांक कवठेकर - कला, वृषाली राजवाडे- शैक्षणिक आणि अनुपमा कुलकर्णी- शास्त्रज्ञ आदींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ब्राह्मण महासंघ संस्थापक सदस्य आदींना गौरविण्यात आले.

# कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विचाराधीन – उपमुख्यमंत्री अजित पवार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, दि. 03 :- शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी येत्या काळात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा ('एआय'चा) वापर अनिवार्य आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडविण्यासाठी कृषी क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विचाराधीन आहे. त्यासाठी कृषी विभागाने सहकार विभागासोबत समन्वय करून या प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. राज्यातील कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, जगभरातील प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे क्रांतिकारी बदल घडत आहेत. कृषी क्षेत्र सुद्धा याला अपवाद नाही. येत्या काळात बदलते हवामान, अवेळी पडणारा पाऊस, पीकांवर वारंवार होणारा रोगांचा प्रादुर्भाव, मजुरांचा तुटवडा यांवर मात करत शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला पर्याय नाही. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पीक आरोग्याचे विश्लेषण, मातीतील कार्बन प्रमाण शोधणे, मातीच्या आरोग्याची सविस्तर माहिती, तणाचा प्रकार ओळखणे, पूर्वीच्या उत्पन्नाची तुलना, मातीचे तापमान, वातावरणातील आर्द्रता, पिकांवरील कीड व रोगांचा प्रादुर्भाव ओळखणे, तसेच पिकांवरील जैविक-अजैविक ताण ओळखणे शक्य होणार आहे.

# नवी मुंबईतील विज्ञान केंद्राचे काम अंतिम टप्प्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई शहराचा आयकॉनिक ठरणारा महत्वपूर्ण प्रकल्प म्हणजे विज्ञान केंद्र. नेरुळ येथील वंडर्स पार्कलगतच होत असलेल्या विज्ञान केंद्राचे काम पूर्णत्वास आले आहे. केंद्राच्या अवघड अशा डोमसह ९० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. लवकरच विज्ञान केंद्रामध्ये ठेवण्यात येणाऱ्या विज्ञान स्कीटसाठी निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. १०९ कोटी खर्चाच्या या प्रकल्पाच्या निर्मितीचे काम वेगात सुरू आहे. नवी मुंबई शहराची नवी ओळख म्हणून ठरणाऱ्या प्रकल्पामुळे मुंबई, बंगळूर व पिंपरी चिंचवड शहराप्रमाणेच नवी मुंबईत विज्ञान केंद्र निर्माण आकारास येत आहे. पालिकेने नेरुळ सेक्टर १९ अ वंडर्स पार्कच्या नजिकच दहा हेक्टर भूखंडापैकी दोन हेक्टरचा भूखंड या विज्ञान केंद्रासाठी ठेवला आहे. येथील संपूर्ण भूखंड चिल्ड्रन पार्क म्हणून सिडकोने राखीव ठेवला होता. काही भागावर वंडर्स पार्क उभारले असून शिल्लक दोन हेक्टर भूखंडावर पालिकेचे देखणे विज्ञान केंद्र आकारास येत आहे. यात जागतिक दर्जाच्या केंद्रात पायाभूत सोयीसुविधा दिल्या जाणार आहेत. विज्ञान केंद्र आजच्या लहान मुलांसाठी आकर्षक, रोजच्या व्यवहारात विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर काय आहे, भविष्यात याचा फायदा याची प्रचिती देणारे ठरावे यासाठी पर्यावरण, जीवन, ऊर्जा, यंत्र व रोबोट, अंतराळ घटकांचा त्याच्यात अंतर्भाव आहे.

# ऐन परीक्षांच्या काळात विजेचा लपंडाव

## काँग्रेसचा आंदोलनाचा इशारा



डोंबिवली : 10 व 12 विच्या परीक्षा जवळ आल्या असून डोंबिवलीतील काही भागात वीज पुरवठा खंडित होत आहे. विद्यार्थ्यांना याचा त्रास होत असून नागरिकही नाराजी व्यक्त करत आहे. याकडे डोंबिवली शहर काँग्रेस कमिटी (बी) ब्लॉक पूर्व विभाग उपाध्यक्ष प्रणव केणे यांनी लक्ष देत महावितरण कंपनीला पत्र दिले.

डोंबिवली शहर काँग्रेस कमिटी (बी) ब्लॉक पूर्व विभाग उपाध्यक्ष प्रणव केणे म्हणाले, डोंबिवली शहरात वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होत असून फेब्रुवारी महिन्यात इयत्ता 10 वी व 12 वी ची वार्षिक परीक्षा सुरु होत आहे. विद्युत पुरवठा खंडीत होऊन विद्यार्थ्या ना परीक्षेच्या पूर्व तयारी करण्यास त्रास होत आहे. याचा महावितरण कंपनीने गंभीर्याने विचार करून विजेचा लंपडाव बंद करावा, अन्यथा काँग्रेस पक्षाकडून लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असा इशारा दिला आहे.

# दादरमध्ये ग्रंथोत्सव

मुंबई : मुंबई शहराचा जिल्हा ग्रंथोत्सव दि.५ आणि ६ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर (पू.) येथे संपन्न होणार आहे. या ग्रंथोत्सवात विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता ग्रंथोत्सवाची सुरुवात भव्य ग्रंथदिंडीने होणार आहे. त्यानंतर सकाळी ११ ते १ या वेळेत प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटनानंतर "लेखक तुमच्या भेटीला" आणि "एका संगीतकाराची मुशाफिरी" या विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर दि. ६ फेब्रुवारी रोजी मराठीतील दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन, व्याख्याने आणि परिसंवाद होणार आहेत. तसेच "शब्दव्रती" या कार्यक्रमात निवडक मराठी कवयित्रींच्या कविता सादर केल्या जातील. याशिवाय, ग्रंथालयातील महत्वपूर्ण घटकांचा प्रातिनिधिक गौरव करून ग्रंथोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे. मराठीतील दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन आणि परिसंवाद होणार आहेत.

दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचा मुंबईकर नागरिक, ग्रंथप्रेमी व साहित्य रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी, मुंबई शहर शशिकांत काकड यांनी केले आहे.

# फांगुळगव्हाण - मोरोशी साकवचे काम सुरु



कल्याण : मुरबाड तालुक्यातील शेवटची ग्रामपंचायत असलेली फांगुणगव्हाण ते मोरोशी दरम्याच्या साकावची अखेरीस वर्क ऑर्डर निघाली आणि प्रत्यक्ष कामाला देखील सुरुवात झाली असून पुढील पावसाळ्यात जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागणार नाही, येथील ग्रामस्थांनी दाखवलेली एकजूट व पत्रकार संजय कांबळे यांनी याचा केलेला यशस्वी पाठपुराव्यामुळे आदिवासी, गोरगरीब, विद्यार्थी, वयोवृद्ध, महिला, पुरुष यांचा वर्षानुवर्षे सुरु असलेला'वनवास, आता संपणार आहे. मुरबाड तालुक्यातील शेवटची आणि नैसर्गिक सौदर्याने नटलेल्या माळशेज घाटातील ग्रामपंचायत म्हणून'फांगुणगव्हाण, ओळखली जाते, येथील साकरवाडी, फांगुणगव्हाण व निरगुडपाडा गावातील, विद्यार्थी, वयोवृद्ध, महिला, पुरुष यांना मोरोशी आश्रमशाळा येथे जाण्यासाठी माशाचा ओहळ मधून जीव धोक्यात घालून येजा करावी लागत होती, काही वर्षापूर्वी येथून एक शाळकरी मुलगा वाहून देखील गेला होता,प्रशासनाकडे पुल/साकाव साठी, अर्ज, विंनत्या करून थकले मात्र दाद कोणी घेईना? त्यामुळे गावातील ग्रामस्थांनी स्वखर्चाने या नाल्यावर पुल बांधला आणि त्यांची सोय केली, शासनाच्या या नाकर्तेपणाणी बातमी पत्रकार संजय कांबळे यांनी विविध वृत्तपत्रे व एस न्यूज च्या माध्यमातून प्रसिद्ध केली, , हा विषय सातत्याने मांडला, लावून धरला, वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, यांना भेटून याचा पाठपुरावा केला, अखेरीस ३० डिसेंबर २०२४रोजी या कामाची वर्क ऑर्डर निघाली व आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पुढील पावसाळ्यात आम्ही या पुलावरून प्रवास करु, कित्येक वर्षांपासून रस्त्याविना सुरु असलेला आमचा वनवास आता संपेल असा विश्वास सुदाम भला , भगवान भला, किरण कारभाळ, भाऊ वाख, मा उपसरपंच रविंद्र भला, नानू मेंगाळ,सदस्यां मनिषा कारभळ, राजु भला आदी ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# मुरबाड शहरात संत तुकोबांची जयंती



मुरबाड : संत शिरोमणी, जगद्गुरु तुकाराम महाराज यांची जयंती प्रथमच मुरबाड मध्ये साजरी करण्यात आली. संपुर्ण जगाला भक्ती आणि शक्ती यांचा संगम यांचा करून तत्कालीन समाजव्यवस्थेवर कडाडुन विरोध करुन समाजातील कर्मकांड, अनिष्ठ रूढी, परंपरा यांना छेद देऊन आपल्या अभंग वाणीतून समाजिक प्रबोधन करणारे महान संत म्हणून आज तुकाराम महारांजाकडे पाहिले जाते.वारकरी सांप्रदाय संत तुकाराम महाराजांना आदर्श म्हणून पाहतात. अशा या थोर संताची महाराष्ट्रात तुकाराम बिज साजरी केली जाते परंतु जयंती साजरी होताना दिसत नाही.परंतु मुरबाड मधिल छत्रपती संभाजी नगर येथिल कै.गोविंद भोईर गुरूजी चौकात 2 फेब्रुवारी 2025 रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

जनसेवा शिक्षण मंडळ शिवळे विद्यालयाचे प्राचार्य यशवंत धलपे सर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक सुरेश साबळे, सोपान गोल्हे, उमेश पाटील, भालचंद्र गोडांबे, दादाजी यशवंत राव,निलेश गायकर, संतोष चौधरी, ज्योतीताई गोडांबे, पत्रकार दिलीप पवार, अरूण ठाकरे,शंकर गोहिल,रविंद्र भोईर, प्रविण पवार यांच्यासह मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या. विशेष म्हणजे प्रतिमा पुजनावेळी तुकाराम गाथा व भारतिय संविधानाचे पुजन करण्यात येऊन अनेक मान्यवरांनी संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर प्रकाश झोत टाकला.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी संदीप ओंबासेंची उपस्थिती



कल्याण : तायक्वांदो असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि रेल्वे सुरक्षा बलाचे क्राईम इन्स्पेक्टर संदीप ओंबासे हे उत्तराखंड येथे होणाऱ्या 38 वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (नॅशनल गेमस्) साठी 4 फेब्रुवारी ते 14 फेब्रुवारी या कालावधीत स्पर्धेसाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत 32 विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून या स्पर्धेत महाराष्ट्रातील जवळजवळ 900 पुरुष व महिला खेळाडू पदाधिकारी, मार्गदर्शक, संघव्यवस्थापक, अधिकारी व पदाधिकारी सहभागी होत आहेत.

या स्पर्धेस विशेष अतिथी म्हणून आमंत्रीत असणारे संदीप ओंबासे हे खेळाडूंचा उत्साह, मनोधैर्य तसेच खेळाडूंना स्फूर्ती व प्रेरणा देणारी ठरणार आहे. यामुळे उत्तराखंड येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये देखील आपल्या महाराष्ट्राचा संघगुणवत्तेचा नविन विक्रम करणार आहे. गतवर्षीच्या राष्ट्रीय स्पर्धेप्रमाणे पुन्हा संपूर्ण भारतात प्रथम येऊन राज्याचा दैदिप्यमान गौरव अबाधित ठेवण्या साठी आपली उपस्थिती मोलाची ठरणार असल्याचे मत महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेचे महासचिव नामदेव शिरगावकर यांनी व्यक्त केले.

# डोंबिवली जिमखाना खेळाडूंचा क्रीडा पुरस्काराने सन्मान



डोंबिवली : महाराष्ट्रातच न व्हे तर देशभर जिम्नॅस्टिक खेळात डोंबिवलीतील भोईर जिमखान्याने नाव उंचाविले आहे. भोईर जिमखाना क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून चमकत आहे. भोईर जिमखाना मधील पाच खेळाडूंना २०२२-२३ या वर्षासाठी प्रतिष्ठित जिल्हा क्रीडा पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्र सरकारकडून देण्यात येणारा हा पुरस्कार गेल्या पाच वर्षातील खेळाडूंच्या गुणवंत कामगिरीची दखल घेतो.२६ जानेवारी रोजी झालेल्या पुरस्कार सोहळ्यात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थिती लावली, ज्यांनी विजेत्यांना पुरस्कार प्रदान केले.मनेश संजय गाढवे, अथर्व शिंपी, सेजल जाधव,राही पाखले,आदर्श भोईर या खेळाडूंना २०२२-२३ साठी पुरस्कार प्रदान झाला आहे. हे खेळाडू कठोर परिश्रम, समर्पण आणि यशासाठी अथक प्रयत्नांचे उदाहरण देतात, ज्यांना अत्याधुनिक सुविधा, प्रगत प्रशिक्षण प्रणाली आणि भोईर जिमखान्याने प्रदान केलेल्या क्रीडा विज्ञान कार्यक्रमांचे पाठबळ आहे असे संस्थापक मुकुंद भोईर म्हणाले. माजी आ.रमेश पाटील यांचे पाठिंब्याबद्दल आभार मान्यात आले. या खेळाडूंचे प्रशिक्षक रवींद्र शिर्के, नंदकिशोर तावडे व अनिता जाधवयांचेही अभिनंदन करण्यात आले.

# घणसोली जेष्ठ नागरिक संघाचा स्नेहमेळावा

नवी मुंबई :जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था (रजि) व ओम साईराम मॉर्निंग वॉक ग्रुप घणसोली नवी मुंबई तर्फे शनिवार दिनांक 1/2/2025 रोजी कै .आण्णासाहेब पाटील स्मृतिभवन कोपरखैरणे नवी मुंबई येथे स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता .या स्नेहमेळावा कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष श्री भास्कर आव्हाड ,सचिव श्री उत्तम बनसोडे व अन्य पदाधिकारी श्री महादेव शिंदे ,श्री रमेश रणपिसे ,श्री बाबुराव नायकल व श्री प्रभाकर देशमुख व प्रमोद गायकवाड यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून तसेच छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आली .या स्नेह मेळाव्यास प्रमुख उपस्थित मान्यवर .श्री शंकर शेठ लक्ष्मण पिंगळे साहेब -अध्यक्ष एपीएमसी मार्केट ,व कुलस्वामिनी को ऑप क्रेडिट सोसायटी व संचालक ,ए एस पी पब्लिक स्कूल तसेच श्री कृष्णा बापू पाटील -समाजसेवक व माजी नगरसेवक तसेच श्री चंद्रकांत जाधव -अध्यक्ष सांगली को ऑप बँक व श्री प्रमोद चव्हाण पत्रकार व श्री प्रदीप जोशी -जेष्ठ वृत्तपत्र लेखक व मुक्त पत्रकार -अध्यक्ष महाराष्ट्र अनुदानित आयुर्वेद व युनानी शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांचा संस्थेचे अध्यक्ष ,सचिव ,उपाध्यक्ष खजिनदार ,उपसचिव व उप खजिनदार यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .संस्थेने आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यास मान्यवर उपस्थित पाहुण्यांनी आपापले मनोगत व्यक्त करून सर्व उपस्थितांना स्नेह मेळाव्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्यात .या स्नेह मेळाव्यास जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्थांचे व ओम साईराम मॉर्निंग वॉक ग्रुप च्या सदस्य सह कुटुंब सह परिवार उपस्थित होते त्यांच्या मनोरंजना साठी श्री राजाभाऊ गायकवाड यांच्या सुश्राव्य असा हिंदी व मराठी गीतांचा बहारदार संगीत (ऑर्केस्ट्रा ) कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्याचा मनमुराद आनंद सर्वांनी घेतला .स्नेह मेळाव्यास आवर्जून भेट देणाऱ्या सर्व मान्यवर व्यक्तीचा सत्कार संस्थेचे पदाधिकारी व कार्यकारिनि सदस्य यांचे तर्फे शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ची जबाबदारी श्री शिवाजीराव पाटील यांनी उत्तम् व यशस्वीरित्या पार पाडले तसेच ह्या स्नेह मेळाव्यास जवळपास ६00 पुरुष व महिला सदस्या उपस्थित होत्या हा आनंदमय सोहळा यशस्वीरित्या व उत्तम प्रकारे पार पाडण्यासाठी श्री संतोष कुलकर्णी , श्री कुंजीर ,श्री बोडके ,श्री चंदनशिवे ,श्री जुनघरे ,श्री सूर्यवंशी ,श्री अशोक जाधव ,श्री निकम ,श्री शिगवन ,श्री बाजीराव कदम ,श्री राजन भगत ,श्री घुले ,श्री चौधरी ,श्री पवार ,श्री शिरवडेकर ,श्री राणे ,तसेच महिला सदस्या सौ सुनीता गायकवाड ,सौ रंजना कुंजीर ,सौ झगडे ,सौ सायली घुले यांनी मोलाचे सहकार्य केले .सर्वांनी स्नेह भोजनाचा मनमुराद आस्वाद घेऊन समाधान व्यक्त केले त्यानंतर कार्यक्रमाची सांगता अध्यक्ष यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून व राष्ट्रगीताने करण्यात आली

# न्यायालयाचा निवडणूक आयोगाला दणका

## वाढीव मतदानाचे पुरावे सादर करण्याचे आदेश



मुंबई : विधानसभा निवडणूकीनंतर विरोधी पक्षांकडून निकालाबाबत आणि निवडणूक प्रक्रियेबाबत सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. याच संदर्भात आज मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूण आदेश दिला आहे. विधानसभा निवडणुकीत सायंकाळी ६ नंतर झालेल्या मतदानाच्या संदर्भात दाखल केलेल्या याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सुनावणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र निवडणूक अधिकारी आणि निवडणूक आयोगाला नोटीस दिली. सायंकाळी ६ नंतर झालेल्या मतदानाचे व्हिडिओ देण्याचे आदेश या नोटीसमध्ये दिले आहे. तसेच या नोटीसला दोन आठवड्यात उत्तर द्यावे, असेही मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या नोटीसीत म्हटले आहे.

मतदानाच्या दिवशी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर संध्याकाळी सहा वाजल्यानंतर ७६ लाख मतदान झाल्याचे दिसत आहे. जर एवढे मतदान झाले असेल तर संध्याकाळनंतर प्रत्येक बुथवर किती मतदारांना टोकन वाटले याची आकडेवारी आणि व्हिडीओ क्लीप द्या, अशी मागणी प्रकाश आंबेडकर यांच्यासह विरोधी पक्षाने केली आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आज सुनावणी झाली. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र निवडणूक आयोगाच्या मुख्य अधिकाऱ्याला नोटीस बजावण्यात आली.

# मंजुनाथ महाविद्यालयात 'आपत्कालीन व्यवस्थापन' कार्यशाळा



कल्याण : १ ते ७ फेब्रुवारी वनवणवा सप्ताह साजरा करून सर्वत्र जनजागृती केली जाते. जंगलातील मानवी हस्तक्षेप व नैसर्गिक कारणांमुळे आग लागण्याचे घटनेत प्रचंड वाढ झाली आहे. जंगलाला आग लागून झाडं नाहीसे होत आहेत त्यावर अवलंबून असलेली पक्षांची घरटी, ढोली व त्यांची अंडी थोडक्यात वन्यजीवन आणि वनसंपदा नष्ट होऊन वन्यजीवांचा नाहक बळी जात आहे. ठाकुर्ली येथील मंजुनाथ महाविद्यालय येथे आपत्कालीन व्यवस्थापन विषयांवर वनवणवा, आगीची कारणे, साहित्यांचे आधारे आग विझविणे इ. यासंदर्भात विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

तसेच प्रथोमचार पेटी मधील त्रिकोणी पट्टी, बॅंडेजचा वापर करणे, कृत्रिम पद्धतीने स्ट्रेचर बनविणे याविषयावर वन्यजीव अभ्यासक सुहास पवार यांनी उपस्थीत विद्यार्थ्यांना माहिती दिली. याप्रसंगी प्राध्यापिका निशा देवधर, माधुरी महाराव तसेच राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक, विद्यार्थी वर्ग, शिक्षकवृंद व महाविद्यालयीन अन्य कर्मचारी उपस्थीत असल्याची माहिती प्रशिक्षण मार्गदर्शक सुहास पवार यांनी दिली.

# 'हार्दिक शुभेच्छा' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

मराठी चित्रपटसृष्टीतील एक अनोखा आणि वेगळा विचार घेऊन प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवणारा अभिनेता, दिग्दर्शक पुष्कर जोग पुन्हा एकदा एका अनोख्या विषयावर भाष्य करणारा चित्रपट प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहे. त्याच्या आगामी चित्रपटाचे नाव 'हार्दिक शुभेच्छा ... पण त्याचं काय?' असून लैंगिक सुसंगतता या विषयावर भाष्य करणारा हा चित्रपट आहे. या चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले असून यात एका नवविवाहित दाम्पत्य पाहायला मिळत आहे. ही कथा प्रेक्षकांना नातेसंबंधातील एका महत्वाच्या पैलूशी जोडून ठेवेल. "हार्दिक शुभेच्छा ... पण त्याचं काय?" या चित्रपटात वैवाहिक जीवनातील लैंगिक सुसंगतीचे महत्त्व अधोरेखीत करण्यात आले आहे. हा चित्रपट २१ मार्च २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून यात पुष्कर जोग, हेमल इंगळे, पूर्वी मुंदडा, विशाखा सुभेदार, अभिजीत चव्हाण, अनुष्का सरकटे, पृथ्विक प्रताप, विजय पाटकर, भरत सावळे आणि किशोरी अंबिये यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पुष्कर जोग यांच्या आधीच्या चित्रपटांप्रमाणेच, या चित्रपटातही नात्यातील गुंतागुंत, भावनिक संघर्ष, आणि जीवनातील काही कंगोरे मांडण्यात आले आहेत. पुष्कर जोगचे चित्रपट प्रेक्षकांना नेहमीच विचार करायला भाग पाडणारे असतात आणि हा चित्रपटही त्या परंपरेतून तयार झाला आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण दुबईसह ॲमस्टरडॅम आणि पॅरिसमध्ये झाले असून खासियत म्हणजे ॲमस्टरडॅम आणि पॅरिस मध्ये चित्रित होणारा हा पहिला मराठी चित्रपट आहे.

दिग्दर्शक पुष्कर जोग म्हणतात, "आजच्या आधुनिक काळातही लैंगिक सुसंगतता हा विषय अनेकदा दुर्लक्षित केला जातो. नातेसंबंधांना फक्त भावनिक किंवा मानसिक बळ पुरेसं नसतं, तर शारीरिक सुसंगतता देखील तेवढीच महत्त्वाची आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून आम्ही हा विषय एका सहज पद्धतीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे."

आनंद पंडित मोशन पिक्चर्स प्रस्तुत, गुझबम्प्स एंटरटेनमेंट यांच्या सहयोगाने 'हार्दिक शुभेच्छा ... पण त्याचं काय?' हा चित्रपट येत्या २१ मार्च २०२५ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन व लेखन पुष्कर जोग यांनी केले असून आनंद पंडित, रुपा पंडित आणि पुष्कर जोग निर्माते आहेत. तर या चित्रपटाचे सहलेखन नमिष चापेकर यांनी केले आहे. पॅनोरमा स्टुडिओजने या चित्रपटाच्या वितरणाची धुरा सांभाळली आहे.

# बांग्लादेशीविरोधात पोलीस सक्रिय

## पडताळणीत बांग्लादेशी आढळल्यास हॉटेल-बार मालकांवर होणार कारवाई

कल्याण : कल्याण पोलिस बांग्लादेशी घुसखोरांविरूद्ध ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. हॉटेल-बार मालक आणि लॉज ऑपरेटरला पोलिसांनी यासंदर्भात कठोर इशारा दिला आहे. तसेच, प्रत्येक व्यवसाय आस्थापनाला असा इशारा देण्यात आला आहे की जर पडताळणीत बांग्लादेशी आढळल्यास आस्थापना मालकांवर कठोर कारवाई केली जाईल.

कल्याण परिमंडळ 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, परिमंडळ 3 च्या सर्व पोलिस स्टेशन भागात हॉटेल-बार मालक आणि लॉज ऑपरेटरला नोटीस पाठवून कठोर इशारा देण्यात आला आहे. तसेच कामगार आणि कर्मचाऱ्यांची पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी भाजपचे नेते किरीट सोमैया यांनी कल्याण तहसीलमध्ये 1250 बांगलादेशी लोकांच्या घुसखोरीचा दावा केला. सोमैयाच्या या दाव्यानंतर कल्याणमध्ये खूप खळबळ उडाली.

सोमैयाच्या दाव्यानंतर पोलिस कारवाईत आले आहेत आणि त्यांनी कल्याण आणि डोंबिवलीत चौकशी सुरू केली आहे. भारतात राहणार्या बेकायदेशीर बांग्लादेशीच्या शोध मोहीमेसाठी हॉटेल व्यापारी, बार एंड रेस्टॉरंट्स, लॉजिंग बोर्डींग, कामगार कंत्राटदार आणि बांधकाम व्यावसायिकांना कल्याण डोंबिवली हद्दीतील पोलिस स्टेशन मध्ये संबंधित ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांचे पडताळणी पत्र सादर करण्यास सांगितले आहे. त्या बाबतची माहिती पोलिस स्टेशन माहिती शक्य तितक्या लवकर द्यायची आहे. त्याच वेळी, त्यांना असा इशारा देण्यात आला आहे की जर बांग्लादेशी मजूर संबंधित ठिकाणी आढळले तर माहिती लपविण्या प्रकरणी मालकांवर कठोर कारवाई केली जाईल.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून,
एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९१९०८२६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024